**CNR No :- MHSI100001512023**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. २५/२०२३ :–

## –: निशाणी २२ वरील आदेश :–

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध पारीत झालेला "पुरावा बंद"चा आदेश रद्दबातल होण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत दाव्याचे कामी न्यायालयाने दि.३१.०७.२०२४ रोजी वादीतर्फे पुरावा बंद करण्यात आलेला आहे असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदर कामी वादी व वादीचे वकीलांना वादीतर्फे पुरावा नेमण्यात आल्याबाबत वेळेत समजून न आल्यामुळे वादीस पुरावा देता आलेला नाही. याकामी वादीस त्याचेतर्फे पुरावा देण्याची संधी न मिळाल्यास वादीचे न्याय हक्कावर गदा येणारी असून वादीचे अपरीमित अशा स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. या दाव्याचा न्यायोचीत निर्णय होण्यासाठी वादीतर्फे पुरावा बंद करण्यात आलेला आदेश रद्दबातल होऊन मिळण्याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादीस म्हणणे दाखल करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत दाखल न केलेने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध दि.१३.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विना म्हणणे चालविणेत आला.

०४. अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांना पुरावा सादर करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी पुराव्याकामी स्वारस्य न दाखविल्याने त्यांच्या विरुद्ध दि.३१.०७.२०२४ रोजी "पुरावा बंद"'चा आदेश पारीत करण्यात आला. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. न्यायालयाचा अमुल्य वेळ वादीच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु वादीस पुरावा सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर झाल्यास, वादीस विविध ठिकाणी अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी कार्यवाहीची पुनरावृत्ती करणेस भाग पडणारे आहे. वादीने केलेल्या सदर कृत्याबाबत खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन होणारे आहे. तसेच वादीस पुरावा सादर करण्याची संधी उपलब्ध करुन दिल्यास दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे:-

**-:: <u>आदेश</u> ::-**

१. रक्कम रु.३००/-(रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.२२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जाकामी झालेली खर्चाची रक्कम रु.३००/-(रुपये तीनशे मात्र) भरणा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला दि.३१.०७.२०२४ रोजीचा "पुरावा बंद" चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. सदर खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) मोफत

विधी सेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करावयाची आहे.

४. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.11.05 17:10:04 +0530

ठिकाण – दोडामार्ग.
दिनांक – ०५.११.२०२५.

(वाय. पी. बांवकर)
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.